PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Sasurwashin
Year: 1978

Song: Mala Bayko Milali Hi kasali
Lyricist: Shanta Shelke, Chintamani Potdar

मला बायको मिळाली ही कसली रं
माझ्या डोईवर चढून बसली
मला बायको मिळाली ही कसली रं
माझ्या डोईवर चढून बसली
मला नवरा मिळाला ह्यो कसला गं
जसा गुळाला मुंगळा डसला
मला नवरा मिळाला ह्यो कसला गं
जसा गुळाला मुंगळा डसला

किती डाफरून बोलतायं आता
तव्हा गोंडा का घोळवत व्हता
अहो किती डाफरून बोलतायं आता
तव्हा गोंडा का घोळवत व्हता
गोंडा आणि मी चल फूट फूट
कशा थापा मारून मला टाकलं भारून
कशा थापा मारून मला टाकलं भारून
तुम्हां देऊन बा माझा फसला
तुम्हां देऊन बा माझा फसला
मला नवरा मिळाला ह्यो कसला गं
जसा गुळाला मुंगळा डसला
मला नवरा मिळाला ह्यो कसला गं
जसा गुळाला मुंगळा डसला

माझ्या सपनाची गं राणी
होती हेमामालिनी वानी
माझ्या सपनाची गं राणी
होती हेमामालिनी वानी
नाही देवाची साथ तुझ्या असल्या रूपात
नाही देवाची साथ तुझ्या असल्या रूपात
जणू हिडिंबा घरात घुसली
हे जणू हिडिंबा घरात घुसली
मला बायको मिळाली ही कसली रं
माझ्या डोईवर चढून बसली
मला बायको मिळाली ही कसली रं
माझ्या डोईवर चढून बसली

तुम्ही धरमेंदर हायसा काय
भाव हिरोचा का खाताय
तुम्ही धरमेंदर  हायसा काय
भाव हिरोचा का खाताय
आयातं दावून गा जरा आयन्यात बघा
आयातं दावून गा जरा आयन्यात बघा
तुमच्या मुखड्यात म्हसोबा ठसला
तुमच्या मुखड्यात म्हसोबा ठसला
मला नवरा मिळाला ह्यो कसला गं
जसा गुळाला मुंगळा डसला
मला नवरा मिळाला ह्यो कसला गं
जसा गुळाला मुंगळा डसला

अगं बास बास बास
बास झाला ह्यो रिकामा वाद
लई वंगाळ भांडायचा नाद
बास झाला ह्यो रिकामा वाद
लई वंगाळ भांडायचा नाद
तुमच्यासाठीच मी माझ्यासाठी तुम्ही
तुमच्यासाठीच मी माझ्यासाठी तुम्ही

Literacy for a Billion

परमेश्वरानं जोड अशी नेमली
पोपट मैनेची पिरती जमली
कशी गालात खुदकन हसली रं
मला बायको मिळाली ही असली

मला नवरा मिळाला ह्यो असला गं
माझ्या काळजाच्या खोपीत बसला
कशी गालात खुदकन हसली रं
मला बायको मिळाली ही असली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*